नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 26/10/2020 (सोमवार)
(सायंकाळ)

---

## कोंढाळी अंतर्गत म्हसाळा शिवारातील गुलमोहर फार्म हाउस येथे सुरू असलेल्या आय.पी.एल जुगार अड्डयावर स्थानिक गुन्हे शाखेची धाड..... वाडी येथील दिनेश बंसोड पोलीसांचे जाळ्यात एकुण 13,38,598/– रू चा माल जप्त

सध्या यु.ए.ई देशात सुरू असलेल्या इंडीयन प्रिमीयर लिंग चे क्रिकेट सामने सुरू असुन, त्यातच आयपीएल वर जुगार खेळण्याचे वाढते प्रमाण पाहता दिनांक 24.10.2020 रोजी के.के.आर विरूध्द डिसी यांचा सामना दुपारी खेळला जाणार आहे. यांची खात्रीशिर माहीती स्थानिक गून्हे शाखा, नागपूर ग्रामीण चे पथकास मिळालेल्या गुप्त माहीतीच्या अनुषंगाने कोंढाळी अंतर्गत म्हसाळा शिवारातील गुलमोहर फॉर्म हाउस येथील एका कॉटेज मध्ये काही इसम क्रिकेट मॅचवर हारजीतचा जुगार खेळत असल्याबाबत प्राप्त माहीतीची शहानिशा करून खात्री झाल्याने तेथे रेड केली. रेड दरम्यान आरोपी 1) दिनेश ताराचंद बन्सोड वय 52 वर्ष रा धम्मकिर्ती नगर वाडी 2) अमोल शंकरराव नाडीनवार वय 40 वर्ष रा प्लॉट नं 138 गजानन नगर वाठोडा नागपुर असे केकेआर विरूध्द डिसी यांच्या सुरू असलेल्या क्रिकेट सामन्यावर ऑनलाईन जुगार खेळतांना मिळुन आले. त्यांचे ताब्यातुन नगदी 8,770/–रू तसेच 8 मोबाईल, 1 चारचाकी वाहन, एलसीडी टिव्ही व ईतर साहीत्य असा एकुण 13,38,598/– रू चा माल जप्त करण्यात आला असुन, पोलीस स्टेशन कोंढाळी येथे सदर दोन्ही आरोपी व फॉर्म हाउस चे मालक व मॅनेजर प्रविन बंडुजी वाकडे वय 33 वर्ष रा देशमुख ले–आउट कोंढाळी यांचे विरूध्द महाराष्ट्र जुगार कायद्यान्वयें गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ढगे पोस्टे कोंढाळी करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री राकेश ओला, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तसेच मा. श्री राहुल माकणीकर, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनात श्री अनिल जिट्टावार, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण, सहा.पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक नरेंन्द्र गौरखेडे, सपोउपनि जय शर्मा, मायकल डेनिअल, पोलीस हवालदार संतोष पंधरे, गजेंद्र चौधरी, महेश जाधव, अविनाश राऊत, राजेंद्र सनोडिया, विजय डोंगरे, पोलीस नाईक सुरेश गाते, पोलीस शिपाई रोहन डाखोरे, महेश बिसने, बालाजी साखरे, महीला पोलीस शिपाई नम्रता बघेल, चालक पोलीस हवालदार भाउराव खंडाते, सर्व नेमणुक स्थानीक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण तसेच पोलीस स्टेशन कोंढाळी चे ठाणेदार श्याम गव्हाणे यांच्या स्टाफ सह संयुक्तरीत्या पार पाडण्यात आली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर